मराठी साप्ताहिक

# युवाशक्ती एक्सप्रेस

RNI No. MAHMAR/2016/72543



रुबिना मुल्ला
कार्यकारी संपादिका
9890879757

वर्ष ७वे | अंक :१५ | रविवार दि.१३ जुलै ते शनिवार १९ जुलै २०२५ | किंमत रू. १/- | पृष्ठ : ४

पान २ संपादकीय — अपेक्षा, वास्तव आणि धोरणे..
पान ३ — पेल्हार परिसरातील अनधिकृत....
पान ४ — विधानसभा गाजवली! आमदार राजन नाईक

## ‘अपात्र अधिकाऱ्यांकडून अपील ऐकवले; वसई पंचायत समितीत कायदयाची थट्टा!’

वसई पंचायत समिती कार्यालयात माहिती अधिकार कायद्यानुसार दाखल झालेल्या प्रथम अपील प्रकरणात गंभीर गैरप्रकार उघडकीस आला आहे. अपिलीय अधिकारी कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित असतानाही, अपील ऐकण्यासाठी अधिकृत नसलेले आणि कायदेशीर अधिकार नसलेले वर्ग-२ दर्जाचे सहाय्यक प्रशासन अधिकारी श्री. युवराज शिवगण यांना अपील ऐकण्याची जबाबदारी देण्यात आली. हा प्रकार केवळ प्रशासकीय हलगर्जीपणाच नव्हे, तर माहिती अधिकार कायद्याचा उघडपणे अपमान असल्याचा गंभीर आरोप तक्रारदाराने केला आहे.सदर अपील जानेवारी २०२५ मध्ये माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) नुसार दाखल करण्यात आले होते. वसई तालुक्यातील




ग्रामपंचायतींकडून सहा महिने उलटूनही माहिती न मिळाल्याने अपील करण्यात आले होते. तक्रारदाराने वेळोवेळी पाठपुरावा करूनही सुनावणी घेण्यात टाळाटाळ केल्यानंतर अखेर ११ जुलै २०२५ रोजी अपीलसाठी सुनावणी निश्चित करण्यात आली. मात्र त्या दिवशी अपिलीय अधिकारी कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित असूनही अपील श्री. युवराज शिवगण यांनी ऐकले.या बदलाबाबत कोणताही अधिकृत आदेश, अधिसूचना किंवा लेखी पत्र जारी करण्यात आले नव्हते.

तक्रारदाराला अपिलीय अधिकारी बदलल्याची कोणतीही पूर्वसूचना देण्यात आली नव्हती, तसेच सुनावणीच्या वेळीही त्यासंदर्भात कोणताही अधिकृत दस्तऐवज दाखवण्यात आला नाही. त्यामुळे संपूर्ण सुनावणी प्रक्रिया बेकायदेशीर ठरते.त्याहून गंभीर बाब म्हणजे अपील फेटाळताना दिलेले कारण. अपिलीय अधिकाऱ्याने निणायामध्ये नमूद केले की, तक्रारदाराने माहिती कोणत्या कारणासाठी हवी आहे ते नमूद केलेले नाही. मात्र, माहिती अधिकार कायद्यातील कलम ६ (२) मध्ये स्पष्ट नमूद आहे की, 'The applicant shall not be required to give any reason for requesting the information.' त्यामुळे हे कारण कायद्याच्या मूळ तरतुदींच्या सरळ विरोधात आहे.

पान नं.२वर

## वसईत अमली पदार्थांची तस्करी करणारी टोळी जेरबंद – ११ जणांना अटक, लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त!

वसई | प्रतिनिधी- पालघर जिल्ह्यातील वसई-विरार परिसरात अमली पदार्थांची विक्री करणाऱ्या टोळ्यांविरुद्ध सुरू असलेल्या मोहिमेला मोठे यश मिळाले असून, बोईसर पोलिसांनी अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या ११ जणांच्या टोळीचा पर्दाफाश केला आहे. यात दोन महिलांचा देखील समावेश असून, सर्व आरोपींना गुन्हे अन्वेषण विभागाच्या विशेष पथकाने अटक केली आहे. बोईसरमधील एका इसमाच्या अटकेनंतर पुढे केलेल्या सखोल तपासातून ही टोळी कार्यरत असल्याची माहिती समोर आली. बोईसर येथील एका इमारतीमध्ये गुप्तपणे ही तस्करी सुरू होती. याठिकाणी ७५ हजार रुपये किमतीचे अंमली पदार्थ, ९ लाखांचे मोबाईल फोन, व शस्त्रास्त्रांचा साठा



मिळून आला आहे.टोळीचा कार्यपद्धतीचा पॅटर्न ठरलेला:या टोळीतील सदस्य हे मुंबई, ठाणे, नालासोपारा, डोंबिवली, काशीमिरा, नायगाव परिसरातील असून, सोशल मीडियाच्या माध्यमातून गुन्हेगारी जाळं विस्तारले जात होते. महिलांचा वापर करून वितरण, वाहतूक आणि व्यवहार केले जात होते.युवकांना लक्ष्य करणे, शाळा-कॉलेज परिसरात विक्री करणे हा मुख्य हेतू असल्याचे तपासातून स्पष्ट झाले आहे. यासाठी टोळीने विशिष्ट संकेतशब्द आणि ऑनलाईन पेमेंट प्रणालीचा वापर केला जात होता.

पान नं.२वर

## कचराकुंडीत सापडले एक महिन्याचे निष्पाप बाळ – माणुसकीला काळिमा फासणारी घटना!

### समाजाने आता जागे व्हावे – स्त्री असो वा पुरुष, प्रत्येक बालक हे सृष्टीचे वरदान आहे.

नालासोपारा, वसई | प्रतिनिधी गुरुवारी दुपारी नालासोपारा पश्चिम येथील कळंब खाडी परिसरात भर पावसात कचराकुंडीत टाकलेले साधारण महिन्याभराचे बाळ आढळल्याची हृदयद्रावक घटना समोर आली आहे. एका नागरिकाने लघुशंकेसाठी गाठलेल्या कचराकुंडीतून बाळाच्या रडण्याचा आवाज ऐकून कुतूहलाने शोध घेतला असता, प्लॅस्टिकच्या पिशवीत गुंडाळलेले निष्पाप बालक त्याला सापडले.तत्काळ या सजग नागरिकाने ११२ क्रमांकावर संपर्क

### सुशांत पवार यांची प्रतिक्रिया
### (परिवर्तन लढा – एक क्रांतीची चाहूल)

**‘या नीच कृत्यामागे केवळ लैंगिक भेदभाव की भोगलालसी मानसिकता आहे, हे पोलिसांनी सखोल तपासातून स्पष्ट करावे. जर मूल नको असेल, तर असे लाखो जोडपे आहेत जे मूलबाळासाठी याचना करत आहेत. त्यांनी त्या बाळाला दत्तक घ्यावे – पण कचराकुंडीत टाकणे हे अमानवी अत्याचार आहे.’ ‘मी Mira Bhayandar-Vasai Virar पोलिसांना नम्र विनंती करतो की या बाळाच्या पालकांना शोधून काढून कठोर कायदेशीर कारवाई करावी, जेणेकरून अशी घृणास्पद कृत्ये पुन्हा कोणी करण्याचे धाडस करणार नाही.’ ‘या नीच कृत्यामागे केवळ लैंगिक भेदभाव की भोगलालसी मानसिकता आहे, हे पोलिसांनी सखोल तपासातून स्पष्ट करावे. जर मूल नको असेल, तर असे लाखो जोडपे आहेत जे मूलबाळासाठी याचना करत आहेत. त्यांनी त्या बाळाला दत्तक घ्यावे – पण कचराकुंडीत टाकणे हे अमानवी अत्याचार आहे.’**

साधून पोलीस यंत्रणेला याबाबत माहिती दिली. घटना नालासोपारा, वसई आणि अर्नाळा सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत येत असल्यामुळे तिन्ही पोलीस ठाण्याचे अधिकारी घटनास्थळी हजर झाले. बाळाला तातडीने वाचवून बोळींज येथील बाल संगोपन केंद्रात दाखल करण्यात आले आहे.सामाजिक मानसिकतेवर प्रश्नचिन्ह ही घटना केवळ अपराध नसून समाजाच्या मानसिकतेचे अधःपतन दर्शवणारी आहे. आजही मुलगा-मुलगी हा भेद समाजात आहे, आणि ज्या दिवशी समाज हे समजून घेईल की बालक हे ‘लिंग’ नाही, तर ‘जगण्याचं दैवत’ आहे, त्या दिवशी अशी कृत्ये थांबतील. समाजासाठी संदेश: बाळ हे केवळ आपली ‘मजा’ पूर्ण करण्याचे साधन नाही – ते एक जबाबदारी आहे, प्रेमाचे रूप आहे, आणि सृष्टीचा चमत्कार आहे.
बाळ कोणाचेही असो, ते आपलेच असते – त्यांना रस्त्यावर फेकणे नव्हे तर हृदयात जपणे हेच मानवतेचे खरे रूप आहे.



# संपादकीय...!

## अपेक्षा, वास्तव आणि धोरणे

नोकरीचा चंद्र विविध विभागांमधील रिक्त पदांचा आढावा घेऊन राज्य सरकार लवकरच महाभरती करील, ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा या नोकऱ्यांसाठी इच्छुक उमेदवारांच्या आशा उंचावणारी आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा मुहूर्त यामागे असला, तरी कोणत्याही मार्गाने नोकरी मिळावी, या प्रतीक्षेत असलेल्या बेरोजगारांना त्यातून दिलासा मिळू शकतो. अर्थात, जाहीर केल्याप्रमाणे सर्व विभागांमधील आढावा घेऊन रिक्त पदे आणि भरतीचा तपशील समोर येण्यास काही काळ लागेल.विविध विभागांमधील रिक्त पदांचा आढावा घेऊन राज्य सरकार लवकरच महाभरती करील, ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा या नोकऱ्यांसाठी इच्छुक उमेदवारांच्या आशा उंचावणारी आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा मुहूर्त यामागे असला, तरी कोणत्याही मार्गाने नोकरी मिळावी, या प्रतीक्षेत असलेल्या बेरोजगारांना त्यातून दिलासा मिळू शकतो. अर्थात, जाहीर केल्याप्रमाणे सर्व विभागांमधील आढावा घेऊन रिक्त पदे आणि भरतीचा तपशील समोर येण्यास काही काळ लागेल. कर्मचारी संघटनांच्या आक्षेपांनुसार यांपैकी किती पदांवर थेट सरकारी नोकरी मिळणार आणि किती पदे कंत्राटी असतील, हासुद्धा मोठा प्रश्न आहे. सरकारने सर्व विभागांना दिलेल्या सूचनांप्रमाणे कर्मचाऱ्यांचा आकृतिबंध, नियुक्ती नियमांत सुधारणा आणि अनुकंपा तत्त्वावरील पदे यांतून नेमकी माहिती समोर येणार असून, त्यानंतर ही महाभरती होईल. विधानसभेच्या गेल्या निवडणुकीपूर्वी ७५ हजार पदांच्या भरतीची घोषणा करून, प्रत्यक्षात एक लाख पदे भरल्याचा दावा करून फडणवीस यांनी या नव्या भरतीचे सूतोवाच केले आहे.सरकारी नोकऱ्यांचे तरुणांमधील आकर्षण, प्रत्यक्षात निर्माण होणारी पदे आणि त्यांवरील भरती, हे प्रमाण पूर्वीपासूनच कमालीचे व्यस्त आहे. त्यातही राज्य सरकारपुढील आर्थिक मर्यादा पाहता, सरकारी नोकरी दुर्मीळच ठरली आहे. सन १९८०मध्ये तर आर्थिक अडचणींमुळे शून्याधारित अर्थसंकल्प मांडून सरकारने भरतीच बंद केली होती. गेल्या काही काळात ती पुन्हा सुरू झाली असली, तरी कोणत्याही सरकारी विभागात रिक्त पदांचे प्रमाण तब्बल ३० ते ३५ टक्के इतके आहे, असे सांगण्यात येते. 'सरकारी काम अन् सहा महिने थांब,' असा अनुभव सर्वसामान्य नागरिकांना येत असला, तरी त्यामागे अपुरा कर्मचारीवर्ग, हेसुद्धा महत्त्वाचे कारण आहे. गेल्या वर्षीच्या माहितीनुसार विविध सरकारी विभाग व निमसरकारी संस्था यांत सुमारे पावणेतीन लाख पदे रिक्त आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था आणि शिक्षकांचा विचार केला, तर ही संख्या याहून मोठी आहे. नागरिकांचा थेट संबंध येणाऱ्या पोलिस, आरोग्य; तसेच महसूल अशा विभागांमध्ये अपुऱ्या कर्मचाऱ्यांचा फटका अंतिमतः नागरिकांना बसत आहे. परिणामी सरकारी कार्यक्षमताही कमालीची घटली आहे. त्यामुळेच उपलब्ध कर्मचाऱ्यांवरील वाढता ताण, शिक्षकांअभावी शिक्षणाचा बोजवारा आणि सरकारी योजना-प्रकल्पांची कूर्मगती, याचा अनुभव नित्याचा झाला आहे. या तुलनेत राज्य सरकारकडून दर वर्षी होणारी भरती साधारण दोन हजारांच्या घरात, म्हणजे आत्यंतिक तुटपुंजी आहे. मागणीच्या तुलनेत अर्थ खात्याकडून नगण्य संख्येने भरतीला परवानगी मिळते. आरक्षणातील जागा आणि अनुकंपा तत्त्वावरील पदांच्या भरतीमध्येही अनेक अडचणी आहेत. त्यातच दिल्लीपासून गल्लीपर्यंत 'मिनिमम गव्हर्न्मेंट'च्या घोषणेखाली 'डाउनसाइझिंग' करीत, नोकऱ्या देण्यापासून अंग काढून घेण्याचेच धोरण सर्व सरकारांनी अवलंबिले, हे वास्तव आहे. दुसरीकडे सर्व क्षेत्रांतील खासगीकरण-कंत्राटीकरणाचे सरकारमध्येही चांगलाच शिरकाव झाला आहे. सरकारने गाजावाजा केलेल्या एक लाखांच्या भरतीपैकीही बहुतांश पदे कंत्राटी असल्याचा कर्मचारी संघटनांचा आक्षेपही दुर्लक्षित करता येणार नाही.बेरोजगारीचा प्रश्न साऱ्या देशातच दिवसेंदिवस उग्र बनत आहे. विविध समाजांतील आरक्षणाची आंदोलने, परप्रांतीयांविरोधातील रोष या सर्वांच्या मुळाशी रोजगार हिरावले जात असल्याची भावनाही मोठी आहे. मात्र, हा प्रश्न म्हणजे आतबट्ट्याची शेती, घटती औद्योगिक मागणी, कौशल्यांचा अभाव अशा अत्यंत गुंतागुंतीच्या आर्थिक-सामाजिक दुष्टचक्राचा भाग असून सरकारी भरती, ही त्यावरील मलमपट्टीच आहे. देशातील एकूण रोजगारांमध्ये सरकारी नोकऱ्यांचे प्रमाण दोन ते तीन टक्के इतकेच असले, तरी त्या नोकरीतील सुरक्षितता, अधिकार आणि मानसन्मानामुळे युवकांना त्याचे आकर्षण वाटणे साहजिक आहे. मात्र, सध्या राज्य सरकारच्या उत्पन्नापैकी ५५ ते ६० टक्के वाटा पगारावर खर्च होत असताना आणि उत्पन्नाचे स्रोत दिवसेंदिवस आक्रसत असताना रोजगार देण्याच्या राज्य सरकारच्या क्षमतेवरही मर्यादा आहेत. हे वास्तव लक्षात घेऊन, खासगी क्षेत्रातील नोकऱ्या किंवा स्वयंरोजगाराची मानसिकता तरुणांमध्ये निर्माण केली पाहिजे. रोजगारनिर्मिती हे सरकारचे काम नसले, तरी रोजगार मिळेल अशी व्यवस्था आणि वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी निःसंशय सरकारचीच आहे. त्यासाठी नवनवे उद्योग सुरू होण्याकडे लक्ष पुरविणे आणि तरुणांना नवी कौशल्ये उपलब्ध करून देणे, हा दूरचा वाटला, तरी शाश्वत उपाय आहे. पूर्वी कविवर्य नारायण सुर्वे यांना 'भाकरी'मध्ये चंद्र दिसला होता; आता ही जागा 'नोकरी'ने घेतल्याचे चित्र महाराष्ट्राच्या घराघरांत आहे. त्यातून निर्माण होणाऱ्या असंतोषाची दखल सरकारला घ्यावीच लागेल. मराठी मध्ये संपादकीय विश्लेषण सोबत तयार करून देणे

## 'अपात्र अधिकाऱ्यांकडून अपील ऐकवले....पान नं १

तक्रारदाराने विचारलेला मुख्य प्रश्न होता की, ग्रामपंचायतींनी सहा महिने उलटूनही मागितलेली माहिती का दिली नाही? यावर अपिलीय अधिकाऱ्यांनी काहीही विचार न करता, उलट माहिती का हवी आहे हे न विचारल्यामुळेच अपील फेटाळण्यात आले. यावरून प्रशासनातील काही अधिकारी माहिती लपवणाऱ्या ग्रामपंचायतींच्या मदतीला धावून आले आहेत, असा संशय व्यक्त करण्यात येत आहे.याशिवाय, अपील फेटाळताना कोणताही साक्षाधारित, कारणांसहित, लेखी आदेश देण्यात आलेला नाही. एक अनामिक वृत्तपत्रातील बातमीचा उल्लेख करण्यात आला आहे, परंतु त्याचे कोणतेही दस्तऐवज, कात्रण, प्रकाशन दिनांक किंवा संदर्भ क्रमांक अपील फाईलमध्ये जोडलेला नाही. माहिती अधिकार कायदा हा रेकॉर्डवर आधारित असतो, अशा अप्रमाणित माध्यमांवर नव्हे.सदर प्रकरणाबाबत तक्रारदाराने पुढील तीन अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रारी दाखल केल्या आहेत — ग्रामविकास संचालनालय, पुणे; मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर; आणि गटविकास अधिकारी, पंचायत समिती वसई.तक्रारीत मागणी करण्यात आली आहे की, अपिलीय अधिकारी हजर असतानाही अपील का ऐकले गेले नाही? अपात्र अधिकाऱ्याला अपील ऐकण्याचा अधिकार देणारा कोणता आदेश होता आणि तो अपील फाईलमध्ये का सादर झाला नाही? त्याचप्रमाणे, कायद्याच्या उल्लंघनात सामील असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी.तक्रारदाराने प्रशासनाला ३० दिवसांची मुदत देऊन, उत्तर न मिळाल्यास माहिती अधिकार कायद्याच्या कलम १८(१) (a), (b), (f) आणि २० (१) अंतर्गत दुसरे अपील आणि तक्रार कोकण विभागीय आयुक्त कार्यालयात दाखल करण्याचा इशारा दिला आहे. याशिवाय, अपात्र अधिकाऱ्याच्या विरोधात 'Quo Warranto' व्रिट याचिका दाखल करून कायदेशीर लढा देण्याची तयारीही व्यक्त केली आहे.

## वसईत अमली पदार्थांची तस्करी....पान नं १

संपूर्ण ऑपरेशनच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी बोईसर पोलीस निरीक्षक प्रकाश सावंत यांच्या नेतृत्वाखाली एक खास पथक तयार करण्यात आले होते. या पथकाने गुप्त माहितीच्या आधारे ८ ठिकाणी छापे टाकून कारवाई केली.जप्त मुद्देमालः ७५,००० किंमतीचे अंमली पदार्थ ९,००,००० पेक्षा अधिक किमतीचे मोबाईल धारदार शस्त्रास्त्रे, रोख रक्कम पोलिसांचे आवाहनः'अमली पदार्थांचे जाळे युवा पिढीला धोक्यात आणत आहे. पालकांनी आणि नागरिकांनी जागरूक राहावे. कोणतीही संशयास्पद हालचाल दिसल्यास त्वरित पोलिसांना कळवावे.'

## पेल्हार परिसरातील अनधिकृत....पान नं ३

विक्री सुरू होते. महसूल व शहर नियोजन विभागांनी याकडे दुर्लक्ष केल्याने महापालिकेची कायदेकानूनी व्यवस्था डोळ्यासमोर कोसळताना दिसत आहे.स्थानिकांची मागणी – चौकशी व कडक कारवाई हवी!

नागरिक व सामाजिक कार्यकर्ते या अनधिकृत बांधकामांच्या साखळी मागे असलेल्या अधिकाऱ्यांवर चौकशीची मागणी करत आहेत. एकाच प्रभागात इतक्या मोठ्या प्रमाणात बांधकाम सुरू होऊनही प्रभाग अधिकारी, अभियंते आणि संबंधित विभाग गप्प का? – हा प्रश्न सर्वत्र चर्चेचा विषय ठरतो आहे.वसई-विरार शहराचा नियोजनबद्ध विकास व्हावा, तर अनधिकृत बांधकामांना पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. अन्यथा, हा परिसर भविष्यात बिनधास्त बांधकाम माफियांचा अड्डा बनण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

## वसईतील हॉटेल व्यावसायिकांचे सरकारविरोधी....पान नं ४

विलंब यामुळे त्रस्त झालो आहोत. शासनाने जर आम्हाला न्याय दिला नाही, तर आमच्या उदरनिर्वाहावर गदा येईल.' अशी भावना अनेक हॉटेल मालकांनी व्यक्त केली.प्रमुख मागणी म्हणजे – टॅक्स प्रणाली सुसंगत करावी, परवानग्यांची प्रक्रिया सोपी करावी आणि अनावश्यक दंडात्मक कारवाया त्वरित थांबवाव्यात.आंदोलनात सहभागी प्रमुख संघटना व प्रतिनिधीःवसई-विरार हॉटेल मालक संघटनास्थानिक व्यावसायिक मंडळविविध व्यापारी संघटनांचे प्रतिनिधीजर शासनाने येत्या काही दिवसांत ठोस निणय घेतला नाही, तर भविष्यात जिल्हा स्तरावर तीव्र आंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

### सातिवलीतील अनधिकृत बांधकामांविरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे आंदोलन

## पालघर लोकसभा अध्यक्ष जयेंद्र पाटील यांचे तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण जाहीर....

सातिवली (वसई) परिसरातील वसई-विरार महानगरपालिकेच्या **CUC** क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या अनधिकृत बांधकामांना स्थानिक प्रशासन व महसूल विभागाकडून संरक्षण दिले जात असल्याचा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पालघर लोकसभा अध्यक्ष जयेंद्र पाटील यांनी केला आहे. कायद्याचा संदर्भःमहसूल विभागाने १६ एप्रिल २०२४ च्या परिपत्रकानुसार अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश दिलेले असतानाही, सातत्याने सुरू असलेल्या या बांधकामांवर कोणतीही कारवाई न केल्याने शासनाच्या आदेशांची सर्रास पायमल्ली होत आहे.आंदोलनाची भूमिकाः जयेंद्र पाटील यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की,'जर संबंधित प्रशासनाने येत्या काही दिवसांत कारवाई केली नाही, तर मी स्वतः तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसणार आहे आणि याबाबतची संपूर्ण जबाबदारी शासनाची असेल.' मुख्य मुद्देः ५०० हून अधिक अनधिकृत बांधकामे सातत्याने सुरू महसूल, नगररचना व महापालिका विभाग गप्प का?परिपत्रक असूनही अधिकारी दुर्लक्ष का करत आहेत अनधिकृत बिल्डर आणि काही अधिकारी यांचे साठगाठ असल्याचा आरोप लोकप्रतिनिधी व कार्यकर्त्यांकडून वेळोवेळी तक्रारी देऊनही दुर्लक्ष मागण्याःसातिवली परिसरातील सर्व अनधिकृत बांधकामांवर तातडीने कारवाई करावी.दोषी असलेल्या प्रशासनातील अधिकारी, मंडळ अधिकारी व तलाठ्यांवर शिस्तभंगात्मक कारवाई करावीपरिपत्रकाच्या अंमलबजावणीसंदर्भात खुली चौकशी करावी. कार्यवाहीची अंतिम मुदतःजर ८ दिवसांत कारवाई झाली नाही, तर आमरण उपोषण सुरू करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.या प्रकरणात शासनाने तत्काळ दखल घेऊन कायद्याचे पालन करून कारवाई केली नाही, तर प्रशासनाविरोधात जनआंदोलन पेटण्याची शक्यता नाकारता येत नाही

# सामाजिक न्याय विभागाच्या जळगाव जिल्हा बैठकीत नेतृत्व मंडळींची उपस्थिती — संघटनात्मक विषयांवर मंथन!




जळगाव प्रतिनिधी दिनांक १३ जुलै २०२५ रोजी जळगाव जिल्हा सामाजिक न्याय विभागाची महत्त्वपूर्ण बैठक उत्साहात आणि संघटनात्मक वातावरणात संपन्न झाली. या बैठकीस जिल्ह्यातील विविध स्तरांवरील पदाधिकारी, महिला नेतृत्त्व आणि कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती.या बैठकीच्या अध्यक्षस्थानी जळगाव जिल्हा सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष मा. सुरेशजी पगारे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून सामाजिक न्याय विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष मा. अरुणजी धर्माळे यांनी उपस्थितांना संबोधित करत संघटनेच्या कार्यपद्धती, विस्तार योजना आणि आगामी कार्यकर्तावर्गासाठी धोरणात्मक दिशा दिली. उपस्थित मान्यवरांची नावे:मा. प्रमोद पाटील जिल्हाध्यक्ष, जळगाव जिल्हा ग्रामीण मा. भास्करराव काळे जिल्हा निरीक्षक मा. मलिकजी –शहराध्यक्ष, जळगाव शहरमा. रमेशजी बहारे शहराध्यक्ष, जळगाव शहर सामाजिक न्याय विभाग सौ. संगीताताई भामरे महिला अध्यक्ष, जळगाव जिल्हा मा. कलावती म्हसाने – महिला नेतृत्त्व या बैठकीत सामाजिक न्याय विभागाच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला, तसेच आगामी सामाजिक उपक्रम, जनजागृती मोहिमा, आणि वंचित घटकांसाठी राबवण्यात येणाऱ्या विशेष कार्यक्रमांवर चर्चा झाली. महिला पदाधिकाऱ्यांनीही आपल्या मतप्रदर्शनातून महिला सहभाग वाढवण्यावर भर दिला. भविष्यातील दिशाः बैठकीचा मुख्य उद्देश संघटनेच्या कामात एकसंधता निर्माण करणे, कार्यकर्त्यांचे सबलीकरण करणे आणि सामाजिक न्यायासाठी व्यापक जनआंदोलन उभे करणे हाच होता. प्रशासकीय पातळीवरील अन्यायाविरोधात संघटना भक्कमपणे उभी राहील, असा विश्वास यावेळी सर्वांनी व्यक्त केला.







सातिवली येथील सर्वे क्रमांक ८४ या जागेमध्ये दिनांक २६/१२/२४ रोजी मनपा आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त यांच्या आदेशानुसार प्रभाग समिती 'जी' येथे अंदाजे १६,००० हजार चौ. फुटाचे ७ इंडस्ट्रीयल गाळे निष्कासित करण्यात आले होते. परंतु सदरचे बांधकाम सहाय्यक आयुक्त व अतिरिक्त यांच्या आशिर्वादाने पुन्हा उभे करण्यात आले आहेत.






# नायगाव पूर्वमध्ये भव्य चित्रकला स्पर्धा संपन्न – ८० हून अधिक बाल कलाकारांचा उत्स्फूर्त सहभाग!



नायगाव पूर्व -भारतीय जनता पार्टी नायगाव पूर्व आणि आर. के. फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने १३ जुलै २०२५ रोजी 'भव्य चित्रकला स्पर्धेचे' आयोजन करण्यात आले. या उपक्रमात सुमारे ८० बाल कलाकारांनी उत्साहाने सहभाग घेतला, तर त्यांच्या पालकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्तम प्रतिसाद दिला.या कार्यक्रमाचे आयोजन आर. के. फाउंडेशनचे उपाध्यक्ष मा. प्रवीण खंडागले यांनी केले होते. स्पर्धेतील सर्व सहभागी मुलांना खाद्यपदार्थ आणि आकर्षक भेटवस्तूंचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे व सर्जनशीलतेचे वातावरण अनुभवास मिळाले. कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती लाभलेले मान्यवरः मा. शशी सौरभ मा. महेश तिवारी मा. जयनारायण राय मा. संदीप गायकवाड मा. राज सिंह मा. आश्विन पांचाल विजेत्यांचा सन्मानः या स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिकाचे वितरण भारतीय जनता पार्टीचे उप जिल्हाध्यक्ष कु. रंजीत दादा किणी यांच्या हस्ते करण्यात आले. आपल्या मार्गदर्शनपर शब्दांमधून त्यांनी बालकलाकारांचे कौतुक करत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## पेल्हारमधील अनधिकृत बांधकामांना अधिकाऱ्यांचेच प्रोटेक्शन!

# पेल्हारची ओळख हरपली!



## भूमाफियांवर एमआरटीपी अंतर्गत साधा गुन्हाही दाखल नाही





# पेल्हार परिसरातील अनधिकृत बांधकामांना अधिकाऱ्यांचेच छुपे संरक्षण?

## नियमांचे खुले उल्लंघन, राजकीय व प्रशासकीय आश्रयामुळे वसई-विरार शहराचे नियोजन धोक्यात!

वसई-विरार महानगरपालिकेच्या पेल्हार प्रभागामध्ये सध्या मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामांची भरती चालू असून, स्थानिक नागरिकांत तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. पालिकेच्या नियमांची व कायद्याची सर्रास पायमल्ली होत असतानाही प्रशासन व संबंधित विभागाचे अधिकारी गप्प बसल्यामुळे त्यांच्यावर संरक्षण देत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. वास्तविक स्थिती – काय सुरू आहे पेल्हारमध्ये? पेल्हार आणि परिसरात अनेक जमिनींवर परवानगीशिवाय मोठ्या प्रमाणात बांधकामे सुरू असून, बांधकाम परवानग्या, ७/१२, भूमापन, ना हरकत प्रमाणपत्र या मूलभूत बाबींकडे सर्रास दुर्लक्ष होत आहे. काही बांधकामांना स्थानिक राजकीय मंडळींचे आश्रय असल्याचे देखील बोलले जात आहे. काही ठिकाणी चौथ्या मजल्यापर्यंत बांधकाम पूर्ण झाले असूनही, कोणताही कारवाईचा ठपका नाही.प्रशासनिक निष्क्रियता की मुद्दाम दुर्लक्ष? वसई-विरार महापालिकेच्या विकास नियंत्रण नियमांनुसार, कोणतेही बांधकाम सुरू करण्यासाठी पूर्वपरवानगी आवश्यक आहे. मात्र येथे नियमांचा फज्जा उडत असून, तक्रारी करूनही पालिकेचे अधिकारी कारवाईस टाळाटाळ करीत आहेत. विशेष म्हणजे, 'डेंग्यू' प्रतिबंध मोहिमेच्या नावाखाली सामान्य दुकानदारांवर दंडात्मक कारवाई करणारे कर्मचारी अशा मोठ्या अनधिकृत प्रकल्पांवर मात्र मौन बाळगतात. राजकीय हस्तक्षेपामुळे कायदा अपंग? स्थानिक नागरिकांच्या मते, अशा बांधकामांना राजकीय पाठबळ असल्यामुळे कोणतीही कारवाई होत नाही. बांधकामे सुरू होण्यापूर्वीच त्याचे स्ट्रक्चर, मालमत्ता व्यवहार, जाहिराती यामार्फत पान नं.२वर

# मातीतून आलेला लोकगायक: प्रल्हाद शिंदे

'गाणं म्हणजे नुसती कला नव्हेष्ठ ती जीवनशैली असते, ते साधन असतं जनतेच्या मनाला भिडण्याचं!'
या ओळी लोकगायक प्रल्हाद शिंदे यांच्या संपूर्ण जीवनावर सार्थ ठरतात. आपल्या अनोख्या गायकीनं आणि भावपूर्ण गाण्यांनी त्यांनी महाराष्ट्राच्या रसिकांच्या हृदयात अढळ स्थान निर्माण केलं.



जन्म आणि बालपण
प्रल्हाद शिंदे यांचा जन्म १९३३ साली अहमदनगर जिल्ह्यातील पिंपळगाव या गावात झाला. लहानपणापासूनच त्यांना दारिद्र्य, उपेक्षा आणि अवहेलनांचा सामना करावा लागला. जीवनाच्या या कठीण परिस्थितींनी त्यांची मानसिकता घडवली आणि त्यांच्या गायकीला एक वेगळीच धार दिली.

कुटुंबासह मुंबईमध्ये स्थलांतर केल्यानंतर रेल्वे स्थानकांवर, बाजारांमध्ये आणि गल्लीबोळांत गाणी गात गात त्यांनी आपली कला जिवंत ठेवली. त्यांच्या आई, भाऊ, बहिणी हेही याच गायनात सहभागी असत. संगीत हेच त्यांचं शिक्षण, साधन आणि साधना होतं.

गायनातील विविधता आणि समाजाभिमुखता
प्रल्हाद शिंदे हे केवळ एक गायक नव्हते, तर ते होते जनतेचे सच्चे प्रतिनिधी.
'ऐका सत्यनारायणाची कथा', 'पाऊले चालती पंढरीची वाट', 'चल गं सखे पंढरीला', 'बाप्पा मोरया रे', 'उड जायेगा एक दिन पंछी रहेगा पिंजरा खालीष्ठ'
अशा शेकडो भक्तिगीतांपासून ते भावगीतं, प्रबोधनगीतं, कोळीगीते, कव्वाली, बुद्धगीतं, कीर्तन-भजनं अशा विविध गीतप्रकारांत त्यांनी आपली अमीट छाप उमटवली.

त्यांच्या गायनात अभिनयाची एक खास शैली होती. केसांना गिरक्या, मानेला झटका आणि डोळ्यांतून सळसळणारी ऊर्जा – हे सगळं त्यांच्या गायनात प्रेक्षक अनुभवत असत. त्यामुळेच श्रोते त्यांना 'प्रल्हाद शिंदे दादा' या नावानं प्रेमानं हाक मारत.

बाबासाहेबांचा भक्त गायक
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ते निष्ठावान अनुयायी होते. त्यांच्या कार्यक्रमाचा शेवट ते नेहमी एका भावस्पर्शी गीताने करत:
'अरे सागरा शांत हो जरा, येथे भीम माझा निजलाष्ठ'
हे गाणं गाताना सगळं सभागृह शांत होई. डोळ्यांतून अश्रू वाहत आणि प्रेक्षक त्यांच्या गायकीच्या खोल अर्थाशी नाते जोडत.

संगीताचे एकलव्य
शास्त्रीय शिक्षण न घेता, कोणत्याही गुरूच्या छत्रछायेशिवाय त्यांनी स्वतःची गायक म्हणून ओळख निर्माण केली. एकलव्याप्रमाणे स्वतःचा अभ्यास, निरीक्षण आणि प्रयोग यांच्या आधारे त्यांनी गायनात हातखंडा मिळवला. तबल्याचं उत्तम वादन, उर्दू कव्वालीतून रंगतदार सादरीकरण, आणि लोकसंगीताचा आत्मा त्यांच्या गळ्यात उतरलेला होता.

जानी बाबू, अजीज नाजा, युसूफ आझाद, शंकर शंभू यांसारख्या नामवंत कव्वालांसमोर कव्वालीत त्यांनी सजगपणे टक्कर दिली होती. त्यांच्या आवाजात बांगडीसारखी खणखणीत ताकद होती – जी फक्त मातीतल्या माणसाकडूनच उमटू शकते.

माणसांचा गायक
त्यांनी आयुष्यात फारसा पैसा कमावला नसेल, परंतु त्यांनी असंख्य माणसांची मनं जिंकली. ते जात, धर्म, वर्ग, भाषा यांच्या पलीकडे जाऊन माणसांशी जोडले गेले. लोकांना आपल्यातलंच कोणी वाटावं असा त्यांचा सहजपणा आणि संवाद होता.

संगीताचा वारसा
प्रल्हाद शिंदे यांचा वारसा त्यांच्या पुढच्या पिढ्यांनी सन्मानानं पुढे चालवला. त्यांचे पुत्र – आनंद शिंदे, मिलिंद शिंदे, चंदकांत शिंदे आणि त्यांचे नातवंडे आजही त्यांच्या गाण्यांचा जिवंत ठेवा जपत आहेत. त्यांच्या गाण्यांनी केवळ मनोरंजन केलं नाही, तर जनजागृती केली, संस्कार दिले आणि समाजमन ढवळून काढलं.

शेवटची सलामी
प्रल्हाद शिंदे यांचं निधन २३ जून २००३ रोजी झालं. त्यांनी महाकवी वामनदादा कर्डक यांचे शेवटचे गीत आपल्या आवाजात सादर करून एक अर्थपूर्ण सांगता केली. त्या गाण्याच्या शेवटासोबतच एक युग संपलं – पण एक आठवण जन्माला आली.

शेवटी एवढंचष्ठ
प्रल्हाद शिंदे हे गायक नव्हते – ते एक आंदोलन होते. त्यांच्या आवाजात जनतेचा रुदन होता, भक्तीची तळमळ होती, समतेचा उद्घोष होता. त्यांनी गायलेली हजारो गाणी हे केवळ गीत नव्हे, तर मराठी समाजाच्या भावविश्वाचं प्रतिक आहेत.
अशा मातीतल्या रसरशीत, प्रभावी लोककलावंतास – आपला मानाचा मुजरा!

# विधानसभा गाजवली! आमदार राजन नाईक यांचा अवैध बांधकामावर हल्लाबोल

## मनपा अधिकाऱ्यांवर कारवाईची जोरदार मागणी

नालासोपारा विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजन नाईक यांनी वसई-विरार शहरातील अवैध बांधकाम आणि अनधिकृत नियोजनाच्या समस्येवर विधानसभेत आवाज उठवत मनपा प्रशासनावर थेट आरोप केले. सोमवारी झालेल्या विधानसभेतील प्रश्नोत्तराच्या सत्रात त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईची जोरदार मागणी केली. वसई-विरार महानगरपालिकेच्या अहवालानुसार, शहरात एकूण १०० अनधिकृत प्रकल्पांमध्ये सुमारे ७५० कोटी रुपयांची मालमत्ता अनधिकृतपणे उभारण्यात आली आहे. यापैकी अनेक प्रकरणांमध्ये मनपा प्रशासनाने फक्त दंडात्मक नोटीस पाठवून आपली जबाबदारी पार पाडली आहे. आ. नाईक यांनी सांगितले की, ३२९ प्रकल्पांपैकी केवळ ५६ प्रकल्पांचेच अधिकृत प्रमाणपत्र आहे, उर्वरित प्रकल्प अनधिकृत असून देखील त्यांच्यावर कारवाई झाली नाही. उलट सामान्य नागरिकांना मनस्ताप देणाऱ्या नोटिसा पाठवून त्रास दिला जातोय, हे दुर्दैवी आहे. मनपाच्या भूमिकेवर आ. नाईक यांचा सवाल:'जर एखादा नागरिक नियमभंग करतो, तर त्याच्यावर २०,००० रुपयांचा दंड आणि ३ महिने शिक्षा होऊ शकते. मग जे अधिकारी, भू-माफिया, आणि डेव्हलपर्स मिळून अनधिकृत प्रकल्प उभारत आहेत, त्यांच्यावर कारवाई का नाही?
कायदा बदलण्याची गरज:
विधानसभेत आमदार नाईक यांनी सुचवले की, ज्या अधिकाऱ्यांनी जाणूनबुजून नियम मोडून अनधिकृत परवानग्या दिल्या, अशा अधिकाऱ्यांवर थेट गुन्हे दाखल करून कारवाई झाली पाहिजे. तसेच, भविष्यात असे प्रकार रोखण्यासाठी कायद्यात मूलभूत सुधारणा करण्याची आवश्यकता आहे.
प्रमुख मुद्दे:वसई-विरारमध्ये ८७२ प्रकल्पांपैकी फक्त ५६ प्रकल्पच अधिकृत ७५० कोटींपेक्षा अधिक मालमत्तेचे अवैध बांधकाम
नागरिकांवर दंड व कारवाई, पण दोषी अधिकाऱ्यांवर मौन ३२९ प्रकल्पांवर कोणतीही कायदेशीर वैधता नाही विधानसभा चर्चेतून प्रशासनावर दबाव राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत असे की, जर शासनाने हे प्रकरण गांभीर्याने घेतले, तर वसई-विरारमधील बांधकाम क्षेत्रात पारदर्शकता आणि कायद्याचे शासन यांची पुनर्स्थापना होऊ शकते.

# वसईतील हॉटेल व्यावसायिकांचे सरकारविरोधी आंदोलन!

## महाराष्ट्र सरकारच्या अन्यायकारक धोरणांविरोधात तहसील कार्यालयासमोर निदर्शने -निवेदन सादर

वसई | प्रतिनिधी महाराष्ट्र शासनाच्या वाढत्या टॅक्स दर, नियंत्रण धोरणे आणि हॉटेल व्यवसायावरील अन्यायकारक निर्बंधांविरोधात वसईतील असंख्य हॉटेल मालकांनी मोठ्या संख्येने एकत्र येऊन आंदोलन केले. हे आंदोलन वसई तहसील कार्यालयासमोर पार पडले असून, शासनाच्या अन्यायकारक धोरणांविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.
तहसीलदार यांना निवेदन सादर:
विरोध दर्शवत हॉटेल मालक संघटनेकडून तहसीलदार यांना औपचारिक निवेदन देण्यात आले. या निवेदनात वाढीव टॅक्स दर, वारंवार तपासण्या, विनाकारण दंडात्मक कारवाई, आणि एकूणच व्यवसायावर असलेल्या ताणतणावांविषयी तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.
हॉटेल व्यावसायिकांचे म्हणणे:
'आम्ही कायदेशीर व्यवसाय करतो, रोजगार निर्मिती करतो आणि शासनाला करही भरतो. तरीही आमच्यावर रोज छापा, दंड, परवाना नूतनीकरणात

पान नं.२वर

युवाशक्ती एक्सप्रेस कार्यालय-
९८९०८७९७५७

वृत्तपत्रात प्रसिद्ध होणारा मजकूर आलेल्या कागदपत्रांवर आधारित असतो. त्यामुळे प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत कोणाला आक्षेप असल्यास संबंधितांनी योग्य त्या कागदपत्रांसह **युवाशक्ती एक्सप्रेस** कार्यालयाशी संपर्क साधावा. सदर पुरावे योग्य असल्यास संबंधित बातमी बाबतचा खुलासा प्रसिद्ध केला जाईल. या पत्रात प्रसिद्ध होणा-या मजकुराला मुद्रक स्थळ जबाबदार राहणार नाही.

साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस मते प्रसिद्ध होणा-या कोणत्याही प्रकारच्या जाहिरातींबाबत कुठल्याही प्रकारचा वाद उद्भवल्यास त्याला युवाशक्ती एक्सप्रेस व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वृत्त प्रसिद्धी किंवा अन्य कोणत्याही तत्सम कामासाठी संपादकाशी संपर्क साधायचा असल्यास संबंधितांनी दूरध्वनी कमांक ९८९०८७९७५७ वर संपर्क साधावा.

या नोटीसी द्वारे कळविण्यात येते कि साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणा-या जाहिराती सर्व प्रकारच्या नोटीसी याच्याशी आमचा काहीही संबंध नाही. संबंधित आणि संबंधित व्यक्तीशी परस्पर संबंध साधून त्याबाबत खात्री करावी. साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वर्तमानपत्र व व्यवस्थापन याला कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

संपादक..

Printed,Published And Owned Tushar Rajratna Gaikwad,printed At Vava ArtsB/8 Dronagiri CHS.,Tanki Road Tulinj (E) Tal-Vasai 401209,Published From Room No.10 Kadarbhai Chawl Sarvoday Vasahat Tnki Road Nallasopara (E) Tal--Vasai Dist-Palghar-401209.Editor-tushar Rajratna Gaikwad
RNI NO.MAHMAR/2016/72543. Mobile-9960144348,9890879757,yuvashaktiexpress123@gmail.com www.yuvashaktiexpress.in

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक म्हणून तुषार राजरत्न गायकवाड रु. नं. १०, कादरभाई चाळ, सर्वोदय वसाहत, आंबेडकर नगर, टाकीरोड, नालासोपारा (पुर्व), ४०१२०९. ता. वसई, जि. पालघर, येथे प्रकाशित होऊन ९८९०८७९७५७ में. बाबा आर्टस् बी.०८, मथुरा नगर, द्रोणगिरी अपार्टमेंट, टाकी रोड, साई बाबा मंदिर जवळ, नालासोपारा (पुर्व), ४०१२०९ जि. पालघर, महाराष्ट्र येथे मुद्रित करणयात आले. मोबाईल नं. ९९६०१४४३४८
या अंकात प्रसिद्ध झालेलया बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेलया मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद वसई न्यायालयाच्या कक्षेत) Email:yuvashaktiexpress123@gmail.com www.yuvashaktiexpress.in